# महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई

**(महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ अंतर्गत स्थापित)**

पत्ता :-
१८९ - अे, आनंद कॉम्पलेक्स, पहिला मजला, साने गुरुजी मार्ग, आर्थर रोड नाका, चिंचपोकळी (प.) मुंबई.४०००११.

संपर्क :-
दुरध्वनी क्र. :- 022-23007650
संकेतस्थळ:- www.maharashtramedicalcouncil.in
ई-मेल :- maharashtramcoucnil@gmail.com

क्र. मवैप/जाहीरात/इतर राज्य नोंदणी/२०२६०१९६९ दिनांक : ०५.०६.२०२६

## प्रसिद्धी पत्रक

## इतर राज्यांतील डॉक्टरांना 'ना-हरकत प्रमाणपत्रा'विना नोंदणी — प्रक्रियेत महत्त्वपूर्ण सुधारणा

**मुंबई, दिनांक ०५ जून, २०२६ :** केंद्र सरकारच्या Deregulation Docket – Phase II मधील प्राधान्य क्षेत्र १९ नुसार, तसेच मा. मुख्य सचिव व मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशांनुसार, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने दिनांक १८ मे २०२६ रोजी एक महत्त्वपूर्ण ठराव मंजूर केला असून इतर राज्यांच्या वैद्यकीय परिषदांमध्ये नोंदणीकृत डॉक्टरांच्या महाराष्ट्रातील नोंदणी प्रक्रियेत लक्षणीय सुलभता आणण्यात आली आहे.

या नव्या तरतुदीनुसार, महाराष्ट्रात नोंदणी करू इच्छिणाऱ्या नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांना यापुढे मूळ राज्याच्या वैद्यकीय परिषदेकडून 'ना-हरकत प्रमाणपत्र' (NOC) सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

अर्ज, आवश्यक कागदपत्रे व स्वयंघोषणापत्र सादर केल्यानंतर अर्जदारास तत्काळ नोंदणी क्रमांक प्रदान करण्यात येईल, ज्याद्वारे ते विनाविलंब महाराष्ट्रात वैद्यकीय व्यवसाय सुरू करू शकतील. ही संपूर्ण प्रक्रिया महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या ऑनलाइन पोर्टलद्वारे राबविण्यात येणार आहे.

या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा बदल म्हणजे, NOC मिळविण्याची व सादर करण्याची जबाबदारी आता अर्जदारावर न राहता महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. परिषद स्वतःहून संबंधित राज्याच्या वैद्यकीय परिषदेकडून अंतर्गत पडताळणी करून घेईल.

महाराष्ट्रात वैद्यकीय व्यवसाय करू इच्छिणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांसाठी नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ, जलद व सुव्यवस्थित करणे, हा या सुधारणेचा मूळ उद्देश आहे.

सही/-

**प्रबंधक**

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई

# MAHARASHTRA MEDICAL COUNCIL, MUMBAI

**(Established by Government of Maharashtra under MMC Act, 1965)**

**Address:** 189-A, Anand Complex, 1st Floor, Sane Guruji Marg, Arthur Road Naka, Chinchpokali (West), Mumbai -400011

**Contact Details:**
**Tel No.:** 022-23007650
**Website:** www.maharashtramedicalcouncil.in
**Email Id:** maharashtramcoucnil@gmail.com


**No.MMC/Other state Registration/202601969** **Date:- 05/06/2026**

# Press Note

## Council Eliminates NOC Requirement for Doctors Registered in Other States; Introduces Fast-Track Registration Process

**Mumbai, June 05, 2026**

The Maharashtra Medical Council (MMC) has passed a landmark resolution on May 18, 2026, introducing a fast-track registration process for medical practitioners registered with medical councils of other states. This reform has been undertaken in accordance with Priority Area 19 of the Central Government's Deregulation Docket – Phase II, and in pursuance of the directives issued by the Hon'ble Chief Secretary and the Hon'ble Secretary, Medical Education Department, Government of Maharashtra.

Under the erstwhile procedure, Registered Medical Practitioners seeking registration in Maharashtra were required to obtain and submit a No Objection Certificate (NOC) from their parent or presently registered state medical council. With the passage of this resolution, this requirement stands abolished.

Henceforth, upon submission of the application along with the requisite documents and a self-declaration, the applicant shall be granted a registration number enabling immediate commencement of medical practice in the State of Maharashtra. The entire registration process will be conducted through the Maharashtra Medical Council's dedicated online portal, ensuring transparency, accessibility, and efficiency.

In a significant departure from the earlier practice, the Maharashtra Medical Council will independently undertake internal verification with the parent or presently registered state medical council. The responsibility of obtaining and furnishing verification documentation shall no longer vest with the applicant, but shall be assumed entirely by the Council.

This reform marks a decisive step towards simplifying, expediting, and streamlining the registration process for medical professionals who wish to practice in Maharashtra, in keeping with the Government's broader commitment to ease of doing business and reduction of regulatory burden.

**Sd/-**

**Registrar**

Maharashtra Medical Council